पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८२/२०१८
दिनांक : २७/०७/२०१८

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **०३/०८/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०३/०८/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०७

दिनांक : ०३/०८/२०१८ वेळ : स.११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०३/०८/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २०/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व

प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे.

सबब, डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०३/०८/२०१८ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात ( Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना अनु.जाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे.

सबब, डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०३/०८/२०१८ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८२/२०१८
दिनांक : २७/०७/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.